पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २०० । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार १८/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# श्रावणातील गर्दीचा कहर; लखीसरायमध्ये ७ महिलांचा मृत्यू



## उज्जैनमध्ये १३ भाविकांची प्रकृती बिघडली

उजैन/ पाटना (वृत्तसंस्था)

श्रावणातील तिसरा सोमवार आणि धार्मिक स्थळांवरील दर्शनासाठी झालेल्या प्रचंड गर्दीने देशातील दोन ठिकाणी गंभीर परिस्थिती निर्माण झाली. बिहारमधील लखीसराय येथे अशोकधाम मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर झालेल्या चेंगराचेंगरीत सात महिलांचा मृत्यू झाला असून १२ हून अधिक जण जखमी झाले आहेत. दुसरीकडे, मध्य प्रदेशातील उज्जैन येथे नागपंचमी आणि श्रावणातील तिसरा सोमवार एकाच दिवशी आल्याने महाकाल मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी झाली. हरसिद्धी मंदिरासमोरील बॅरिकेडिंग परिसरात गर्दीचा दबाव वाढल्याने १३ भाविकांची प्रकृती बिघडली.

लखीसरायमध्ये अशोकधाम स्टेशनकडून मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर सोमवारी पहाटे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी रांगेत उभे होते. रात्रीच्या सुमारास रस्त्यावरील विजेचा खांब कोसळला. या खांबामध्ये वीजप्रवाह असल्याने काही भाविक विजेच्या संपर्कात आल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यानंतर अचानक गोंधळ उडाला आणि भाविकांची धावपळ सुरू झाली. याचवेळी बॅरिकेडिंग तुटल्याने अनेक जण एकमेकांवर पडले आणि चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. एसडीपीओ शिवम कुमार यांनी सात जणांच्या मृत्यूची पुष्टी केली असून, विजेचा खांब कोसळून वीजप्रवाहाचा संपर्क आल्याने चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले. मात्र, घटनेचे नेमके कारण सविस्तर तपासानंतरच स्पष्ट होईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडल्याचे सांगण्यात येत असून जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, उज्जैनमध्ये नागचंद्रेश्वर मंदिराचे दर्शन आणि श्रावणातील तिसऱ्या सोमवारनिमित्त महाकाल दर्शनासाठी देशभरातून लाखो भाविक दाखल झाले. वर्षातून केवळ नागपंचमीच्या दिवशी २४ तासांसाठी उघडणाऱ्या नागचंद्रेश्वर मंदिराचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या रांगा लावल्या. दुपारपर्यंत सुमारे ५.५० लाख भाविकांनी दर्शन घेतल्याची माहिती आहे. हरसिद्धी मंदिरासमोरील बॅरिकेडिंग केलेल्या परिसरात गर्दीचा दबाव वाढल्याने अनेक भाविकांची प्रकृती बिघडली. त्यापैकी सुमारे १३ जणांना कुटुंबीय आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांनी जिल्हा रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. उज्जैनमध्ये एकाच दिवशी नागचंद्रेश्वर दर्शन, श्रावण सोमवारचे महाकाल दर्शन आणि भगवान महाकालांची शहरातून निघणारी मिरवणूक असे तीन मोठे धार्मिक कार्यक्रम असल्याने प्रशासनासमोर गर्दी नियंत्रणाचे मोठे आव्हान निर्माण झाले. नागचंद्रेश्वर मंदिराच्या दर्शनासाठी सुमारे ४० हजार भाविक बॅरिकेड्सजवळ रांगेत असल्याचे पोलिसांनी सांगितले होते. तसेच महाकाल दर्शनासाठी पाच लाखांहून अधिक आणि सायंकाळच्या मिरवणुकीसाठी चार ते साडेचार लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती.

लखीसरायमधील दुर्घटनेत जीवितहानी तर उज्जैनमध्ये मोठ्या संख्येने भाविकांची प्रकृती बिघडल्याने धार्मिक उत्सवांदरम्यान गर्दी व्यवस्थापन, वीजसुरक्षा आणि आपत्कालीन यंत्रणेच्या सज्जतेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. लाखोंच्या संख्येने भाविक एकत्र येणाऱ्या ठिकाणी सुरक्षित प्रवेश-निर्गमन मार्ग, मजबूत बॅरिकेडिंग, वीजव्यवस्थेची तपासणी आणि तातडीची वैद्यकीय मदत यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज या घटनांनी अधोरेखित केली आहे.

# सौरऊर्जा घेतली, तरी वीजबिलाचा शॉक !

## उद्योजकांची 'इकडे आड, तिकडे विहीर' परिस्थिती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वीज दरवाढीने सर्वसामान्य ग्राहकांसह व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकही हैराण झाले आहेत. एकीकडे केंद्र सरकारकडून घराघरांत सौरऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांनी सौरऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन केले आहे. तसेच घरगुती ग्राहकांसाठी सौरऊर्जा प्रकल्प उभारणीला मोठ्या प्रमाणावर अनुदानही दिले जात आहे. मात्र दुसरीकडे स्वतःच्या पैशातून लाखो रुपये खर्च करून सौरऊर्जा प्रकल्प उभारणाऱ्या व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांसमोर नवे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

अनेक लघु, मध्यम आणि सेवा उद्योगांनी वीज खर्च कमी होईल, या अपेक्षेने बँकांकडून कर्ज घेऊन सौरऊर्जा प्रकल्प उभारले. सौरऊर्जेची निर्मिती करून स्वतःच्या विजेची गरज भागविण्याबरोबरच अतिरिक्त वीज ग्रीडमध्ये देण्याच्या व्यवस्थेवर त्यांनी मोठी गुंतवणूक केली. त्यावेळी सौरऊर्जेला प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांमुळे भविष्यात वीज खर्चात मोठी बचत होईल, अशी उद्योजकांची अपेक्षा होती. मात्र आता ग्रीडशी संबंधित विविध आकार, शुल्क आणि इतर चार्जेसच्या माध्यमातून वीजबिलाचा आर्थिक भार कमी होण्याऐवजी काही ग्राहकांच्या बाबतीत तो वाढत असल्याची उद्योजकांची तक्रार आहे. सौरऊर्जा प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाचे मासिक हप्ते बँकेला भरायचे, त्याचवेळी सौरऊर्जा उपलब्ध असतानाही वीज वितरण कंपनीकडून मोठ्या रकमेची बिले भरायची, अशी विरोधाभासी परिस्थिती निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे केंद्र सरकार लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे धोरण राबवत असताना, दुसरीकडे वीज खर्चाचा वाढता भार या उद्योगांच्या आर्थिक गणितावर परिणाम करीत आहे.

उत्पादन खर्च वाढला की त्याचा परिणाम वस्तूंच्या किंमतीवर, रोजगारनिर्मितीवर आणि उद्योगांच्या स्पर्धात्मक क्षमतेवर होतो.

सौरऊर्जेला प्रोत्साहन देणे ही केवळ पर्यावरणपूरक भूमिका नसून देशाच्या ऊर्जा सुरक्षेसाठीही महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे सौरऊर्जा स्वीकारणाऱ्या उद्योजकांना धोरणात्मक स्थैर्य आणि आर्थिक दिलासा मिळणे गरजेचे आहे.

(पान २ वर)

# धांदरफळच्या भूमिपुत्राला राष्ट्रपती पोलीस पदक, ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक गावचे भूमिपुत्र तथा स्वर्गीय पंढरीनाथ बजाबा देशमुख व माजी सरपंच शकुंतला देशमुख यांचे सुपुत्र भगीरथ देशमुख यांना गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल भारत सरकारच्यावतीने राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाल्याबद्दल ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्यावतीने अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हा अभिमानाचा ठराव करण्यात आला. भगीरथ देशमुख हे सन १९९३ मध्ये सरळ सेवा पोलीस उपनिरीक्षक म्हणून पोलीस सेवेत रुजू झाले. नागपूर शहर येथे सेवेला सुरुवात केल्यानंतर त्यांनी बीड, छत्रपती संभाजीनगर 'ग्रामीण, जालना, नाशिक ग्रामीण, नाशिक शहर, विशेष सुरक्षा विभाग नागपूर तसेच दहशतवाद विरोधी पथक छत्रपती संभाजीनगर येथे विविध जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडल्या आहेत. (पान २ वर)

# आदिवासी विद्यार्थ्यांचे अर्धनग्न धरणे आंदोलन तीव्र

## घुलेवाडी वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा एल्गार



### जयश्री थोरातांसह विविध नेत्यांचा आंदोलनाला पाठिंबा

**दरम्यान, आंदोलनाची दखल घेत काँग्रेसच्या नेत्या जयश्रीताई थोरात, कार्याध्यक्ष अमोल शेलकर यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आंदोलनस्थळी भेट देत विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला. जयश्रीताई थोरात, अमोल शेलकर, शेखर सोसे, अरुण चव्हाण, राम अरगडे, ओंकार बिडवे, ऋतिक राऊत, सुदर्शन शिंदे, शंतनु भालेकर आदींनी आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतली. यावेळी विद्यार्थ्यांच्या मागण्या रास्त असून शासनाने या आंदोलनाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी भूमिका उपस्थितांनी मांडली. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलनाची व्याप्ती वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे प्रशासनासमोर विद्यार्थ्यांच्या मागण्या सोडविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आदिवासी विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या ५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयाविरोधात घुलेवाडी येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी सुरू केलेले अर्धनग्न धरणे आंदोलन आता अधिक तीव्र झाले आहे. रविवारी आंदोलनाचा तिसरा दिवस होता, तर सोमवारी आंदोलन चौथ्या दिवशी दाखल झाले आहे. गेल्या तीन दिवसांपासून विद्यार्थी आक्रमक पवित्रा घेत असून, शासनाने मागण्या मान्य न केल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

दरम्यान, शासनाने १४ ऑगस्ट रोजी ५ ऑगस्टच्या मूळ शासन निर्णयात काही सुधारणा केल्या. मात्र, या सुधारणा अपुऱ्या असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला असून ५ ऑगस्टचा शासन निर्णय पूर्णपणे रद्द करून २०११ च्या जुन्या शासन निर्णयानुसार सर्व तरतुदी लागू कराव्यात, या प्रमुख मागणीवर विद्यार्थी ठाम आहेत. (पान २ वर)

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132


मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदी वर 30% डिस्काउंट
ऑफर फक्त 31 ऑगस्ट पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

पान १ वरून

## सौरऊर्जा घेतली, तरी ...

'सौरऊर्जा वापरा, वीज बचत करा' असा संदेश देतानाच सौरऊर्जा वापरणाऱ्यांवर वाढीव आर्थिक भार पडणार नाही, याची शासनाने काळजी घेतली पाहिजे. उद्योजकांना सवलतीच्या दरात वीज, योग्य चार्जेसची रचना किंवा आवश्यकतेनुसार अतिरिक्त सबसिडी देण्याचा विचार झाला पाहिजे. आज अनेक उद्योजकांची अवस्था अक्षरशः 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी झाली आहे. सौरऊर्जेसाठी लाखो रुपयांची गुंतवणूक करायची आणि त्यानंतरही वाढीव वीजबिलांचा सामना करायचा, ही परिस्थिती निश्चितच सौरऊर्जेला प्रोत्साहन देणाऱ्या धोरणाच्या उद्देशाला बाधक ठरू शकते. शासनाने आणि वीज वितरण यंत्रणेने उद्योजकांच्या तक्रारी गांभीर्याने ऐकून वाढीव आकारांचा तातडीने फेरविचार करावा.



Abhinav Shikshan Sanstha's

ABHINAV INSTITUTE OF MANAGEMENT & BUSINESS ADMINISTRATION, AKOLE

ADMISSION NOTICE 2026-27

1. Applications are invited from eligible candidates for the probable vacant seats remaining after all CAP rounds (Against CAP) for First Year MBA.
2. Applications are invited from the aspiring candidates who are fulfilling the eligibility criteria as notified by the competent authority for the following course for admission to the vacant seats. for direct second year MBA. (Lateral Entry).

| No. | Courses offered | Intake | Vacancy | DTE Code |
|---|---|---|---|---|
| 1. | MBA First Year | 60 | -- | 5320 |
| 2. | Direct Second Year MBA (Lateral Entry) | 60 | 03 | 5320 |

Further schedule of Vacant Seats Admission is displayed on college Notice Board
(Contact No.9595840484)

DIRECTOR SECRETARY PRESIDENT


# निझर्णेश्वर मंदिराच्या विकासाचा मार्ग मोकळा करणार

## आ. खताळ यांनी सपत्नीक निझर्णेश्वर मंदिरात केली पूजा



संगमनेर - कोकणगाव येथील श्री निझर्णेश्वर मंदिर परिसर वनविभागाच्या हद्दीत येत असल्याने मंदिराच्या विकासकामांमध्ये विविध अडचणी निर्माण होत आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, मंदिर परिसरासाठी वनविभागाची जागा उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू आहेत. आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून वनजमिनीचा प्रश्न लवकर मार्गी लावण्यात येईल, असा विश्वास आ.अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील कोकणगाव येथील श्री निझर्णेश्वर मंदिरात श्रावणातील पहिल्या सोमवारनिमित्त आ. खताळ आणि त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते अभिषेक, पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी सचिन शिंदे, पप्पू गाढे, सुमित काशिद, डॉ. संदीप जोंधळे, महेश जोंधळे, भारत जोंधळे, विजय वामन, आदित्य पवार, रमेश शिंगोटे, प्रज्वल जोंधळे, अमोल जोंधळे, रणजीत जाधव, देवस्थान ट्रस्टचे बबन पवार, दिलीप जोंधळे, गंगाधर वायकर, बाळासाहेब जोंधळे, नंदू पानसरे यांच्यासह देवस्थान ट्रस्ट पदाधिकारी, ग्रामस्थ, शिवभक्त आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले, मायबाप जनतेने मला या तालुक्याची सेवा करण्याची संधी दिल्यापासून निझर्णेश्वर मंदिरासह परिसराच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मंदिर परिसर वनविभागाच्या हद्दीत असल्यामुळे विकासकामांना काही कायदेशीर अडचणी निर्माण होत आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी संबंधित मंत्री आणि शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

निझर्णेश्वर मंदिराची वास्तू जुनी झाल्यामुळे भाविक, ग्रामस्थ आणि देवस्थानशी संबंधित सर्व घटकांची सहमती घेऊन मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंदिराच्या विकासासाठी भाविकांचे योगदान, ग्रामस्थांचे सहकार्य आणि शासनाची मदत यांचा समन्वय साधून काम पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

पान १ वरून

## आदिवासी विद्यार्थ्यांचे ....

यासंदर्भात विद्यार्थ्यांनी प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदनही दिले आहे. शैक्षणिक सुविधांसह आर्थिक तरतुदींमध्ये वाढीची मागणी - विद्यार्थ्यांनी ड्रेसकोडसाठी मिळणारी रक्कम २ हजारांवरून ५ हजार रुपये करावी, अभ्यास दौऱ्याची रक्कम प्राचार्यांच्या पत्रानुसार गृहपाल स्तरावर वितरित करावी, अशी मागणी केली आहे. वाढत्या महागाईचा विचार करून प्रकल्प अहवाल भत्ता ५ हजार रुपये करावा, स्नेहसंमेलनासाठी ५५ हजार रुपये अनुदान द्यावे आणि क्रीडा साहित्याकरिता २५ हजार रुपयांची तरतूद करावी, अशीही मागणी आहे. मुलींच्या स्वच्छता व प्रसाधनासाठी दरमहा १ हजार रुपये, तसेच कार्यशाळेसाठी प्रति विद्यार्थी १ हजार रुपये देण्यात यावेत, अशी मागणीही विद्यार्थ्यांनी केली आहे. वसतिगृहातील पायाभूत सुविधांच्या प्रश्नांकडेही विद्यार्थ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. अपूर्ण राहिलेले वसतिगृह इमारतीचे काम तातडीने पूर्ण करावे, ५०० विद्यार्थ्यांच्या क्षमतेची नवीन इमारत उपलब्ध करून द्यावी

आणि प्रलंबित प्रवेश प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी एमएस-सीआयटी, टॅली, टायपिंग आणि ड्रायव्हिंगसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करावेत, प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांची डीबीटीची रक्कम १५ दिवसांत त्यांच्या खात्यावर जमा करावी, तसेच रखडलेली अभ्यासिका पूर्ण करावी, अशीही मागणी आहे. संगमनेर येथील वसतिगृहातील नवीन गृहपाल व लिपिक यांची तातडीने बदली करावी, अशी मागणीही विद्यार्थ्यांनी केली आहे. वसतिगृहाच्या प्रश्नांबरोबरच राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दाही आंदोलनातून उपस्थित करण्यात आला आहे. गडचिरोली येथील आश्रमशाळेत मृत्युमुखी पडलेल्या विद्यार्थिनीच्या कुटुंबाला तातडीने १ कोटी रुपयांची मदत द्यावी आणि संबंधित दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. राज्यातील सर्व आदिवासी वसतिगृहे व आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचा १० कोटी रुपयांचा विमा उतरवावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. राज्यातील प्रलंबित १२,५०० आदिवासी नोकरभरती प्रक्रिया तातडीने राबवावी, पेसा कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, कार्यमुक्त करण्यात आलेल्या पेसा कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी पुनर्नियुक्ती द्यावी, अशा मागण्याही आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. तसेच रक्ताच्या नातेसंबंधावर आधारित जात पडताळणी प्रमाणपत्रासंदर्भातील शासन निर्णय आणि बंजारा अभ्यास समितीशी संबंधित दोन्ही शासन निर्णय तातडीने रद्द करावेत, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

## धांदरफळच्या भूमिपुत्राला...

तब्बल ३३ वर्षांच्या प्रदीर्घ पोलीस सेवाकाळात त्यांनी ७६९ बक्षिसे व १०५ प्रशंसापत्रे प्राप्त केली आहेत. सन २०१७ मध्ये गुणवत्तापूर्ण सेवेसाठी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन पोलीस महासंचालक यांच्याकडून त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले होते. आता १५ ऑगस्ट, २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने गुणवत्तापूर्ण सेवेसाठी भारत सरकारच्यावतीने त्यांना राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर करण्यात आले आहे. सध्या ते नाशिक येथील राज्य गुप्त वार्ता विभागात अपर उपायुक्त म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, सरपंच उज्वला देशमाने, उपसरपंच भारत कोल्हे, सदस्य, स्वदेश उद्योग समूहाचे बाळासाहेब देशमाने, स्वदेश युवा प्रतिष्ठान, स्वर्गीय मुरलीधर बापूजी वलवे लोकमान्य विद्यालय, के. बी. दादा देशमुख महाविद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# कर्मवीर दादासाहेब रुपवते यांचा इतिहास पुसण्याचा प्रयत्न

## अगस्ति कारखाना संचालक मंडळावर आंबेडकरी समाजाचा आरोप



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - कर्मवीर दादासाहेब रुपवते यांनी अकोले तालुक्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्राच्या उभारणीत दिलेले योगदान दुर्लक्षित केले जात असल्याचा आरोप करत समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने अगस्ति सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सिताराम पा. गायकर यांना निवेदन देण्यात आले आहे. कारखान्याच्या वार्षिक अहवालात दादासाहेब रुपवते यांचा फोटो किंवा संस्थापक अध्यक्ष म्हणून उल्लेख न केल्याबद्दल समाजाने नाराजी व्यक्त केली.

निवेदनात म्हटले आहे की, कर्मवीर दादासाहेब रुपवते यांनी १९६८ ते १९७८ या काळात विधान परिषदेचे सदस्य म्हणून काम केले. तसेच १९७२ ते १९७५ आणि १९७७ ते १९७८ या कालावधीत महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी अनेक खात्यांची जबाबदारी सांभाळली. मुंबईत राहून राजकीय व सामाजिक क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण केले असतानाही त्यांनी अकोले तालुक्याशी असलेली नाळ कायम ठेवली.

कोतुळचा जुना पूल, अकोले येथील मोठा पूल, निळवंडे धरण, अगस्ति अमृतसागर दूध संघ तसेच अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालयाच्या उभारणीत दादासाहेब रुपवते यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. विशेषतः १९९२ मध्ये अगस्ति सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेत दादासाहेब रुपवते यांनी मोठी भूमिका बजावली होती. खासदार शरदचंद्र पवार व राज्यातील इतर नेत्यांच्या सहकार्याने त्यांनी कारखाना मंजूर करून आणला. संगमनेर साखर कारखाना आणि अकोले यांच्यातील कायदेशीर अंतराचा प्रश्न असतानाही अकोले हा आदिवासी भाग असल्याचे नमूद करून विशेष बाब म्हणून कारखान्याला मंजुरी मिळवून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला. तसेच पहिल्या मुख्य प्रवर्तक मंडळाचे ते संस्थापक अध्यक्ष होते. दादासाहेबांचे योगदान मान्य करताना भाषणांमध्ये त्यांचा संस्थापक अध्यक्ष म्हणून उल्लेख केला जातो; मात्र वार्षिक अहवालात त्यांचा साधा फोटोही प्रसिद्ध केला जात नाही, ही बाब समाजाच्या भावना दुखावणारी असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

समाजाच्या प्रमुख पाच मागण्या :

१. कर्मवीर दादासाहेब रुपवते यांची एक प्रतिमा व्यवस्थापकीय संचालकांच्या कार्यालयात आणि दुसरी प्रतिमा तातडीने बैठकीच्या सभागृहात बसवावी. २. सन २०२६-२७ चा वार्षिक अहवाल पुन्हा छापून त्यामध्ये 'कर्मवीर दादासाहेब रुपवते, संस्थापक अध्यक्ष, अगस्ति सहकारी साखर कारखाना' असा स्पष्ट उल्लेख करावा आणि त्याच्या ५० प्रती १५ दिवसांच्या आत उपलब्ध करून द्याव्यात. ३. अगस्ति कारखान्याच्या बैठकीच्या सभागृहाला 'कर्मवीर दादासाहेब रुपवते सभागृह' असे नाव द्यावे. ४. कारखाना आदिवासी भागासाठी विशेष बाब म्हणून मंजूर करून देण्यात दादासाहेबांचे योगदान लक्षात घेऊन वार्षिक अहवालात क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्यासह महापुरुषांचे फोटो प्रसिद्ध करावेत. ५. अगस्ति सहकारी साखर कारखान्याच्या आवारात कर्मवीर रुपवते यांचे स्मारक उभारावे. या मागण्यांची तातडीने पूर्तता करा. दादासाहेब रुपवते यांच्या कार्याचा योग्य सन्मान करण्याची भूमिका कारखाना व्यवस्थापनाने घ्यावी, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

# हायकोर्ट लिपिक भरतीच्या ऑनलाइन परीक्षेत गोंधळ

## अभिजीत दिपकेंचा विद्यार्थ्यांना पाठिंबा



मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपिक पदाच्या टंकलेखन कौशल्य ऑनलाइन परीक्षेत मोठा गोंधळ झाल्याचं छत्रपती संभाजीनगर पाहायला मिळालं. याशिवाय कल्याण, वाशिम आणि भंडारा येथे देखील परीक्षेत तांत्रिक अडचणी दिसून आलं. या परीक्षेतील गोंधळामुळं विद्यार्थींनी कोर्टाच्या आवारात आंदोलन सुरु केले. या विद्यार्थ्यांना समर्थन देण्यासाठी सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके दाखल झाले. याशिवाय कल्याणमधील विद्यार्थ्यांसोबत अभिजीत दिपके यांनी व्हिडीओ कॉलवर संवाद साधला.

मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपिक पदाच्या टंकलेखन कौशल्य ऑनलाइन परीक्षेत राज्यभर गोंधळ झाला आहे. छत्रपती संभाजीनगरचं नाही तर नांदेड, कल्याण, ठाणे, नाशिक, गोंदियामध्ये ऑनलाइन परीक्षेत गोंधळ होत आहे, की बोर्ड काम करत नाही, सर्व्हर काम करत नाही. १० मिनिटात लॉग आऊट होऊन जात आहे. म्हणजेच एका शिफ्टमध्ये असलेले विद्यार्थी फेल झाले. एवढा सगळा गोंधळ असताना ही परीक्षा कशी होऊ शकते, त्यामुळं ही परीक्षा पुन्हा घेतली गेली पाहिजे, असं अभिजीत दिपके यांनी म्हटलं. हा मुद्दा फक्त संभाजीनगरचा राहिलेला नाही, राज्याचा मुद्दा झाला आहे. आरोप विद्यार्थ्यांनी केला.

# पहिला श्रावणी सोमवार आणि नागपंचमीच्या निमित्ताने...

## शिवतत्त्व : मानव कल्याणाचा मार्ग

श्रावण महिन्याचा पहिला सोमवार आणि त्याच दिवशी आलेली नागपंचमी-हा दिवस हिंदू संस्कृतीत अत्यंत पवित्र, मंगलमय आणि श्रद्धेचा मानला जातो. श्रावणातील हा पहिला सण असल्याने भक्तांच्या मनात विशेष उत्साह असतो. संगमनेर परिसरात आज पंचंबा येथे मोठी यात्रा भरते. नागदेवतेचे पूजन केले जाते. तसेच शहर व परिसरातील विविध महादेव मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होत असून, शिवपूजन, अभिषेक आणि आराधनेने मंदिर परिसर भक्तिमय झाला आहे.

नागपंचमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाने कालियानागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून सुरक्षितपणे वर आल्याची कथा सांगितली जाते. शुक्ल पंचमीचा हा दिवस नागपूजनासाठी महत्त्वाचा मानला जातो. आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ मानव नव्हे, तर पशू-पक्षी, वृक्ष-वेली आणि संपूर्ण सृष्टीतील प्रत्येक जीवाबद्दल कृतज्ञता व आदर व्यक्त करण्याची परंपरा. नागपंचमी हा त्याच प्राणीगौरव करणाऱ्या संस्कृतीचा सुंदर आविष्कार आहे.

श्रावण महिन्यात सोमवारला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हिंदू धर्मपरंपरेत हा दिवस माणसामध्ये शिवत्व निर्माण करणारा मानला जातो. शिव म्हणजे कल्याण, शिव म्हणजे सत्य, शिव म्हणजे प्रकाश आणि शिव म्हणजे पवित्रता. म्हणूनच आज आपण भगवान शिवाची पूजा करतो आणि आपल्या अंतरंगातील शिवतत्त्व जागृत करण्याचा प्रयत्न करतो.

आपल्याला शिवपदापर्यंत पोहोचायचे असेल, तर त्यासाठी साधन कोणते? त्याचे उत्तर म्हणजे शिवाची साधना. शिवाची सेवा आणि साधना साधकाला तीन मार्गांनी करता येते-श्रवण, कीर्तन आणि मनन. भक्तिमार्गातून या तीनही साधनांचा अवलंब करून मनुष्य आपल्या अंतर्मनातील शिवतत्त्वाचा शोध घेऊ शकतो.

'शिवपद' या शब्दाचे दोन अर्थ आहेत-एक म्हणजे शिवाचे स्थान आणि दुसरा म्हणजे शिवाचे चरण. शिवाची पूजा करायची म्हणजे प्रथम स्वतःला पवित्र करायचे आणि त्यानंतर शिवाची आराधना करायची. शिवाची उपासना मूर्तीमध्येही होते आणि शिवलिंगामध्येही. शिव हे ब्रह्मस्वरूप आहेत. ते निराकारही आहेत आणि साकारही आहेत. म्हणूनच त्यांना एक बिल्वपत्र अर्पण केले तरी भक्तिभावाने केलेली ती पूजा स्वीकारली जाते.

शिवतत्त्व प्राप्त करणे हे मानवाच्या जीवनाचे एक श्रेष्ठ ध्येय आहे. त्यासाठी शिवभक्ती, शिवपूजन आणि शिवआराधना आवश्यक आहे. शिवपुराणामध्ये शिवमहिमा विविध कथांच्या माध्यमातून सांगितला आहे. मानवाच्या कल्याणाचा मार्ग म्हणजे शिवतत्त्वाचा मार्ग होय. आपण भगवान शिवाला संहारकर्ता म्हणतो. ब्रह्मदेव सृष्टीची निर्मिती करतात, भगवान विष्णू सृष्टीचे पालन करतात आणि भगवान शंकर संहार करतात, असे आपण ऐकतो. मात्र 'संहार' या शब्दाचा अर्थ केवळ नाश करणे असा नाही. 'संहरती' या संकल्पनेत रूपांतराचा अर्थ दडलेला आहे. जीवात्म्याचा परमात्म्याकडे होणारा प्रवास म्हणजेच एक प्रकारचे रूपांतर होय. हे रूपांतर घडवून आणणारे शिवतत्त्व समजून घेणे आवश्यक आहे.

भगवान शिव अत्यंत सरळ, भोळे आणि भक्तांवर



लवकर प्रसन्न होणारे आहेत. म्हणून त्यांना 'आशुतोष' असे म्हटले जाते. 'आशु' म्हणजे लवकर आणि 'तोष' म्हणजे प्रसन्न होणे. जलधारा त्यांना प्रिय आहे. म्हणूनच शिवलिंगावर जलाभिषेक करण्याची परंपरा आहे. महत्त्वाचे म्हणजे शिवतत्त्व बाहेर कुठे शोधण्यापेक्षा ते आपल्या अंतःकरणात आहे, हे जाणून घेणे आवश्यक आहे. आपल्या मनातील चांगुलपणा, सत्य, प्रेम, करुणा, संयम आणि पवित्रता जागृत करणे म्हणजेच आपल्यातील शिवतत्त्व जागृत करणे होय.भगवान शिव भस्म धारण करतात. भस्माला आपल्या परंपरेत विशेष महत्त्व आहे. अग्नीमधून निर्माण झालेले भस्म आपल्याला जीवनाच्या नश्वरतेची जाणीव करून देते. शरीर, संपत्ती, अहंकार आणि सांसारिक वैभव हे सर्व क्षणभंगुर आहे, याची जाणीव शिवाचे भस्मरूप आपल्याला करून देते.

शिवतत्त्वाचा मार्ग हा कल्याणाचा मार्ग आहे; परंतु या मार्गावर चालताना अनेक अडचणी येतात. कठीण साधना, श्रद्धा आणि आत्मसमर्पणाशिवाय हा मार्ग सहज साध्य होत नाही. भगवान विष्णू शंकराची पूजा करीत असताना सहस्र कमळे अर्पण करण्याचे ठरवतात. पूजा करताना एक कमळ कमी पडले. तेव्हा त्यांनी स्वतःचे नेत्र कमलासमान मानून ते शंकराला अर्पण केले, अशी कथा आहे. या कथेतून त्याग, भक्ती आणि समर्पणाचा महान संदेश मिळतो.

भगवान शिवाच्या हातातील त्रिशूल सज्जनांना आश्वासन देतो, तर दुर्जनांना भय निर्माण करतो. भगवान शिवाने अहंकाराचे प्रतीक असलेल्या दक्ष प्रजापतीच्या यज्ञाचा विध्वंस केला, अशी पुराणकथा आहे. त्यांच्या हातातील डमरू नाद, लय आणि संगीताचे प्रतीक आहे. शिवाच्या अंगावर असलेले सर्पही प्रतीकात्मक संदेश देतात. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांसारखे विकार मनुष्याच्या जीवनात असतात. त्यांचा केवळ नाश करण्यापेक्षा त्यांचे उदात्तीकरण करून त्यांना सकारात्मक दिशेने वळविणे आवश्यक आहे. शिवमंदिरात शिवनिर्माल्य ओलांडू नये, अशी परंपरा आहे. पुष्पदंत नावाचा गंधर्व फुले चोरण्यासाठी जात असताना नकळत शिवनिर्माल्य ओलांडतो आणि त्याची अदृश्य होण्याची शक्ती नष्ट होते, अशी कथा शिवमहिम्नस्तोत्राशी जोडली जाते. शक्तीहीन झाल्यानंतर त्याने भगवान शिवाचा महिमा गायला आणि त्यातून शिवमहिम्नस्तोत्राची निर्मिती झाली, असे मानले जाते. जगाच्या कल्याणासाठी आणि रक्षणासाठी ज्यांनी हलाहल विष प्राशन केले, प्रेम, ज्ञान, कल्याण, प्रकाश आणि पवित्रतेची मूर्ती असलेल्या त्या भगवान शिवाला कोटी कोटी प्रणाम. भगवान शिवाच्या तीन नेत्रांचे प्रतीक चंद्र, सूर्य आणि अग्नी असे मानले जाते. त्यांच्या मस्तकावर चंद्रकोर आहे, हातात त्रिशूल आहे आणि अंगावर भस्म आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात निसर्गाच्या पंचमहाभूतांपासून विश्वातील विविध शक्तींचे प्रतीकात्मक दर्शन घडते. ज्याला स्वतःचा अहंकार नाही, ज्याला कोणत्याही एका रूपाची, वेशाची किंवा सीमांची बंधने नाहीत आणि तरीही जो संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी उभा आहे, तो म्हणजे शिव. शिव म्हणजे केवळ मंदिरातील मूर्ती नव्हे. शिव म्हणजे आपल्या अंतःकरणातील कल्याणकारी शक्ती. सत्याचा स्वीकार, प्रेमाची भावना, ज्ञानाची साधना, अहंकाराचा त्याग, परोपकाराची वृत्ती आणि सर्व जीवांविषयी करुणा-यातूनच आपल्या जीवनातील शिवतत्त्व जागृत होते.

आजच्या पहिल्या श्रावणी सोमवार आणि नागपंचमीच्या पवित्र पर्वावर आपण भगवान शिवाची भक्ती करण्याबरोबरच आपल्या अंतर्मनातील शिवत्व जागृत करण्याचा संकल्प करूया. 'सर्वांचे कल्याण व्हावे' ही भावना आपल्या आचरणात आणणे, हाच खऱ्या अर्थाने शिवपूजेचा मार्ग आहे.

हर हर महादेव!

**प्रा. शशांक गंधे**
**संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मोबा.९८९०१६३६४२**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




## नागपंचमी



नागपंचमीचा सन, माय करीते कालवा
धाडा मुऱ्हाळी लवकर, माझ्या ताईला बोलवा ।।धृ।।
झालं लगीन वैशाखात, तशी लेक सासराला,
आस भेटीची मनाला, तिची मूर्ती पहाण्याला,
सणा येते ताई माझी, दारी तोरण सजवा ।।१।।
लग्नानंतर नाही सण, तिला मुळ लावायला,
मन आतुर माझं झालं, लेक जवळ घ्यायला,
सय येई पुन्हा पुन्हा, माझ्या लेकीला भेटवा ।।२।।
दिस गेले, महिने गेले, मन कासावीस झाले,
लेक आठवताच क्षणी, डोळे माझे पान्हावले,
तिला पाठवूनी सासरी, जपते आठवणींचा ठेवा ।।३।।
तिला झोक्यात बसवा, हौस तिची हो पुरवा,
माझ्या बाळाला नटवा, गाणी झुल्याची सुनवा,
हाती पंचारती घेऊन, तिला वारुळा पाठवा ।।४।।
सासरी कितीही सुख, ओढ माहेराची न्यारी,
कुस आईची ही भारी, तिथे आनंद भरजरी,
तिला घालू पाळण्यात, पुन्हा पाळणा झुलवा ।।५।।
लेक माहेरी येणार, मन म्हणं वारंवार,
ये ना बाळा तु लवकर, तुझ्यासाठि उघडी दारं,
तिच्या येण्याने घरभर , पुन्हा आनंद फुलवा ।।६।।
धाडा मुऱ्हाळी लवकर, माझ्या लेकीला बोलवा

**आर. के. राहणे सर,** माजी प्राचार्य
वाघापूर, ता. संगमनेर, मो. ९४०४४०१५००

## दुर्वे नाना स्मृतिप्रीत्यर्थ वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

संगमनेर (प्रतिनिधी) - राष्ट्र सेवा दल, संगमनेर यांच्या वतीने आदिवासी, दलित व श्रमिकांचे नेते साथी भास्करराव दुर्वे नाना यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे ४३ वे वर्ष आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेचे संयोजन साथी भास्करराव दुर्वे स्मारक प्रतिष्ठान, संगमनेर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

ही वक्तृत्व स्पर्धा बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता मानव विकास मंडळ संचलित काशेश्वर विद्यालय, मालपाणी हेल्थ क्लबजवळ, कासारा दुमाला, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे होणार आहे. स्पर्धेत इयत्ता ३ री ते ४ थी, ५ वी ते ६ वी, ७ वी ते ८ वी, ९ वी ते १० वी, ११ वी ते १२ वी तसेच खुला गट अशा विविध गटांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. प्रत्येक गटासाठी सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण, विज्ञान, संविधान, मानवतावाद, राष्ट्रनिर्मिती, रेल्वे विकास आदी विविध विषय देण्यात आले आहेत. स्पर्धेतील सर्व विजेत्यांना बक्षिसे पुस्तकांच्या स्वरूपात देण्यात येणार असून, प्रत्येक गटातील विजेत्या स्पर्धकांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे.

प्रत्येक गटात एका शाळेचे जास्तीत जास्त दोन विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. स्पर्धेचे प्रवेश शुल्क प्रति विद्यार्थी रुपये २० असून, आपल्या विद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वकौशल्याला, वैचारिक जडणघडणीला आणि सामाजिक भानाला चालना मिळणार असून, संगमनेर तालुक्यातील शाळांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रकल्प प्रमुख सोमनाथ मदने,कार्यकारी विश्वस्त राजाभाऊ अवसंक आणि सह प्रकल्प प्रमुख भाऊसाहेब शिंदे यांनी केले आहे.

संपर्क : ९४२२७३१८०९, ९७६५६६७७७२, ९०२८२२१७१७, ७७९८९९९५१३

# संगमनेरमध्ये प्रथमच स्थूलता व वजन व्यवस्थापन क्लिनिकचा शुभारंभ



युवावार्ता (प्रतिनिधी)

वाढते वजन आणि स्थूलतेच्या समस्येने त्रस्त नागरिकांसाठी मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथे 'मेडिकव्हर स्थूलता व वजन व्यवस्थापन क्लिनिक' चा शुभारंभ करण्यात आला. स्थूलता ही केवळ वजन वाढण्याची समस्या नसून तिचा संबंध मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, हार्मोनल समस्या तसेच विविध मेटाबॉलिक आजारांशी असू शकतो. त्यामुळे केवळ वजन कमी करण्याऐवजी रुग्णाचे एकूण आरोग्य सुधारणे आणि दीर्घकालीन निरोगी जीवनशैली विकसित करणे, हा या क्लिनिकचा प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेरच्या सेंटर हेड डॉ. स्नेहल गायके आणि डॉ. जगदीश वाबळे, **MBBS, MD (Medicine)** यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. अतुल पवार, डॉ. योगेश तोरकडी, डॉ. पंकज नंदागवळी, डॉ. सागर कोटकर, डॉ. सागर हासे यांच्यासह हॉस्पिटलचे मार्केटिंग हेड दिपक जाधव, व्यवस्थापक सुजित गायकवाड, विविध विभागांचे प्रमुख, डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. जगदीश वाबळे यांनी स्थूलता आणि वाढत्या वजनामुळे उद्भवणाऱ्या विविध आरोग्यविषयक समस्यांबाबत मार्गदर्शन केले. योग्य आहार, नियमित व्यायाम, जीवनशैलीतील सकारात्मक बदल आणि आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचार यांचा योग्य समन्वय साधणे वजन व्यवस्थापनासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

'मेडिकव्हर स्थूलता व वजन व्यवस्थापन क्लिनिक'च्या माध्यमातून संगमनेर व परिसरातील नागरिकांना वजन व्यवस्थापन, आहार व जीवनशैलीविषयक मार्गदर्शन, मधुमेह व मेटाबॉलिक जोखमीचे व्यवस्थापन तसेच स्थूलतेशी संबंधित आरोग्य समस्यांसाठी आवश्यक वैद्यकीय सल्ला व उपचाराची सुविधा एकाच ठिकाणी मिळणार आहे. वाढते वजन आणि स्थूलतेकडे वेळीच लक्ष देऊन तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर संगमनेरमध्ये सुरू करण्यात आलेले हे विशेष क्लिनिक नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

या क्लिनिकची नियमित ओपीडी दर गुरुवारी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती सेंटर हेड डॉ. स्नेहल गायके यांनी दिली. या वेळेत स्थूलता, वाढते वजन, आहार व जीवनशैली व्यवस्थापन तसेच स्थूलतेशी संबंधित आरोग्य समस्यांबाबत तज्ज्ञ वैद्यकीय मार्गदर्शन आणि आवश्यक उपचार उपलब्ध होणार आहेत. केवळ वजन कमी करणे हा या क्लिनिकचा उद्देश नसून, वजन नियंत्रित करण्यासोबतच रुग्णाचे संपूर्ण आरोग्य सुधारणे आणि त्याला निरोगी व सक्रिय जीवनशैलीकडे वाटचाल करण्यास मदत करणे, हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. मेडिकव्हरचे स्थूलता व वजन व्यवस्थापन क्लिनिक हे संगमनेर व परिसरातील नागरिकांसाठी निरोगी जीवनशैलीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर - निरोगी जीवनासाठी आधुनिक, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेच्या दिशेने आणखी एक पाऊल.

## पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर येथे भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट २०२६ रोजी देशभक्ती, उत्साह आणि अभिमानाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शाळा परिसर तिरंग्याच्या रंगांनी सजविण्यात आला होता.

सुकेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती योगिता सातपुते प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेच्या प्राचार्या श्रीमती मीनाक्षी मिश्रा, पालक समितीचे सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रगीत, ध्वजगीत आणि राज्यगीताने वातावरण देशभक्तीने भारून गेले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध संचलनातून एकता, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि समर्पणाचे दर्शन घडले. तसेच विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व, राष्ट्रनिर्मितीतील युवकांची भूमिका आणि जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्ये यावर प्रेरणादायी भाषणे केली. स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित निबंध लेखन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी



स्वातंत्र्य, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि जबाबदार नागरिकत्व या विषयांवर प्रभावी लेखन केले. उत्कृष्ट लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. इयत्ता सातवीच्या गॅलक्सी आणि Infinity वर्गातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तिपर नृत्याने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. प्राचार्या श्रीमती मीनाक्षी मिश्रा यांनी मार्गदर्शन करताना, स्वातंत्र्य म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर कर्तव्यांची जाणीव, प्रामाणिकपणा, शिस्त, पर्यावरण संवर्धन आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी योगदान देणे होय, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्य आणि जबाबदारीची जोड द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ध्रुवी खताळ आणि हितेन मणियार यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक संकर्शन मुसमाडे, मुक्ता घुंडीयाल, जयश्री देशमुख तसेच कार्यक्रम समन्वयक पंकज कुटे यांनी विशेष परिश्रम घेतले. ॲडमिन ऑफिसर सागर नेरपगार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक समिती, एझढ- सदस्य व विविध विभागांनी सहकार्य केले. उपप्राचार्य श्री. योगेश आवारी यांनी आभार मानले. देशभक्ती, शिस्त, जबाबदारी आणि मूल्यशिक्षणाचा संदेश देणारा हा स्वातंत्र्यदिन सोहळा विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला.

## समता, बंधुता आणि एकात्मतेची मूल्ये रुजवा : डॉ. सुधीर तांबे




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ८०वा वर्धापन दिन संगमनेरमध्ये देशभक्तीपूर्ण वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण, राष्ट्रगीत, राज्यगीत, एन.सी.सी. पथकाचे निरीक्षण, विद्यार्थ्यांच्या कवायती तसेच गुणवंतांचा सन्मान अशा विविध कार्यक्रमांनी सोहळ्याला रंगत आली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुधीर तांबे यांनी स्वातंत्र्याचा अर्थ केवळ परकीय सत्तेपासून मुक्तता नसून सामाजिक समता, बंधुता, एकात्मता आणि प्रत्येक नागरिकाच्या स्वातंत्र्याचे संरक्षण यामध्ये असल्याचे सांगितले. समाजात समता, बंधुता आणि एकात्मतेची मूल्ये रुजविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक कवायतीने उपस्थितांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांनी 'कॉपीमुक्त आणि तणावमुक्त परीक्षा' घेण्याची प्रतिज्ञा करून प्रामाणिकपणे आणि आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्याचा संदेश दिला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थी ईश्वर भरीतकर याने रेखाटलेले डॉ. सुधीर तांबे यांचे व्यक्तिचित्र त्यांना भेट देण्यात आले. तसेच शैक्षणिक व संस्थात्मक कार्यातील योगदानाबद्दल क्षीरसागर सर आणि पवार मॅडम यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास प्राचार्य बाबासाहेब वाघ, प्राचार्य सखाराम खेमनर, उपप्राचार्य नंदू काळे, उपमुख्याध्यापिका सुरेखा दिघे, पर्यवेक्षक किशोर देशमुख, अण्णासाहेब दिघे, भास्कर कुटे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारकांच्या त्यागाचे स्मरण करून राष्ट्राच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# देशसेवा सीमेवर लढण्यासोबतच आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहण्यातही आहे - दिव्या मालपाणी - माहेश्वरी




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त मालपाणी इस्टेट विभागात आयोजित कार्यक्रमास मालपाणी उद्योग समूहाच्या संचालिका दिव्या मालपाणी माहेश्वरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी स्वातंत्र्याचा खरा अर्थ आणि प्रत्येक नागरिकाची देशाप्रती असलेली जबाबदारी याबाबत प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक रमेश घोलप, मालपाणी हाऊस चे मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक शिवाजी आहेर, प्रोसेस विभाग प्रमुख देवदत्त सोमवंशी, मानव संसाधन विभाग प्रमुख रविंद्र कानडे, सुरक्षा रक्षक विभाग प्रमुख मेजर भारत मोरे उपस्थित होते.

दिव्या मालपाणी माहेश्वरी म्हणाल्या की, १५ ऑगस्ट हा केवळ उत्सवाचा दिवस नसून, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी बलिदान देणाऱ्या असंख्य स्वातंत्र्यसैनिक आणि वीर जवानांच्या त्यागाची आठवण करण्याचा दिवस आहे. असंख्य वीरांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या बलिदानामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत.

आज आपण त्या स्वातंत्र्याचा आनंद घेत असलो, तरी या स्वातंत्र्याची किंमत आपण विसरता कामा नये. देशासाठी लढण्याची जबाबदारी केवळ सीमेवर असलेल्या सैनिकांचीच नाही. आपण ज्या क्षेत्रात काम करतो, त्या क्षेत्रात प्रामाणिकपणे, कार्यक्षमतेने आणि जबाबदारीने काम करणे हीदेखील देशसेवाच आहे, असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, एक चांगला कर्मचारी, चांगला सहकारी, कुटुंबातील जबाबदार व्यक्ती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दयाळू व प्रामाणिक नागरिक बनणे, या छोट्या वाटणाऱ्या गोष्टी समाज आणि देश घडविण्यात मोठी भूमिका बजावतात.

आपण आपल्या कामातून, आपल्या वागणुकीतून आणि आपल्या चांगल्या कृतीतून त्या वीरांच्या बलिदानाचे सार्थक केले पाहिजे. देशासाठी, कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी आपण दररोज थोडे अधिक चांगले होण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रास्ताविक करताना मेजर भारत मोरे यांनी सुरक्षा रक्षकांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी चा आढावा सादर केला व सुरक्षा रक्षकांचा गुणगौरव केला, देवदत्त सोमवंशी, शिवाजी आहेर, रमेश घोलप यांनी ही मनोगत व्यक्त केले , सुप्रसिद्ध कवी व निवेदक मुरारी देशपांडे यांनी भारतरत्न स्व अटलबिहारी वाजपेयी यांची देशभक्तीपर कविता व खास विनोदी शैलीत हिंदी भाषेतुन सुरुवात केल्याने उपस्थितामध्ये हास्याचे फवारे उडाले, कार्यक्रमाचे खास आकर्षण सुरक्षा रक्षकांचे पथ संचलन नेत्रदीपक ठरले. सुत्रसंचलन ॲड. संतोष राऊत यांनी केले तर आभार प्रदर्शन जमादार तिलाराम रावत यांनी केले.

## कर्जमुक्ती योजनेचा मार्ग मोकळा

### ६६ हजार शेतकऱ्यांसाठी ६२७ कोटींचा निधी जमा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेला गती मिळत आहे. जिल्हा बँकेच्या २७७ शाखांमध्ये १३६६ सोसायटीचे थकबाकीदार असलेल्या ६६ हजार १४७ शेतकऱ्यांच्या कर्जापोटी बँकेकडे ६२७.४७ कोटी रुपये शासनाकडून जमा झाले आहेत, अशी माहिती जिल्हा बँकेच्या प्रशासक संगीता डोंगरे यांनी दिली.डोंगरे म्हणाल्या, शासनाकडून प्राप्त पहिल्या यादीमधील १ लाख १६ हजार ५१२ कर्जदार सभासदांपैकी १ लाख ५ हजार २२८ सभासदांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. ११ हजार २८४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण मृत, ग्रीस्टक फार्मर आयडी नसणे, परगावी, स्थलांतरित, बायोमॅट्रिक न होणे आदी कारणांमुळे बाकी आहे.

ज्या शेतकरी सभासदांची प्रमाणीकरण प्रक्रिया होऊ शकेल अशा सर्वांची बँक व संस्थेमार्फत पाठपुरावा करून प्रमाणीकरण प्रक्रिया चालू आहे. पात्र सभासदांपैकी मृतांच्या कर्जखात्यांना वारस नोंद करण्याची प्रक्रिया वारसांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था पातळीवर पूर्ण करून घेण्याची सूचना देण्यात आल्याचे बँकेचे मुख्य कार्यकारी



अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी सांगितले.

दरम्यान, आधार प्रमाणीकरणात अहिल्यानगर अव्वल आहे. त्यासाठी मेहनत घेतलेले जिल्हयातील सर्व सचिव, त्यांची यंत्रणा आणि बँक कर्मचारी तसेच तालुका सहनिबंधक व लेखापरिक्षक यांचे बँकेचे प्रशासक डोंगरे, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, जिल्हा विशेष लेखापरीक्षक गौतम निकाळजे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी कौतुक केले आहे. याकामी सहकार विभाग, जिल्हा लेखापरिक्षक कार्यालय तसेच जिल्हा बँकेचे सरव्यवस्थापक, व्यवस्थापक व वरिष्ठ अधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संपादकीय...

# हिरवाईच्या साजात नटलेला श्रावण

श्रावण महिना सुरू झाला की वातावरणातच एक वेगळे चैतन्य निर्माण होते. हिंदू संस्कृतीत श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा महिना केवळ धार्मिक श्रद्धेचा नाही, तर निसर्ग, परंपरा, कुटुंब आणि सामाजिक एकोप्याचा सुंदर संगम घडवून आणणारा काळ आहे. त्यामुळेच श्रावणाला 'सणांचा महिना' आणि 'व्रतवैकल्यांचा महिना' असे म्हटले जाते. श्रावणातील सोमवार विशेष पवित्र मानला जातो. या दिवशी भगवान शिवाची भक्तिभावाने पूजा केली जाते. अनेक भाविक उपवास, अभिषेक आणि विविध धार्मिक विधी करतात. श्रावणातील प्रत्येक दिवसाचेही स्वतंत्र धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. मंगळागौर, नागपंचमी, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला आणि बैलपोळा अशा विविध सण-उत्सवांनी हा महिना अक्षरशः बहरून जातो. त्यानंतर येणाऱ्या गौरी-गणपतीच्या उत्सवाची चाहूलही श्रावणापासूनच लागते. नागपंचमीपासून दसरा-दिवाळीपर्यंतच्या सणांची जणू सुरुवातच श्रावणातून होते. त्यामुळे घराघरांत उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते. सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत, नातेवाईकांच्या भेटीगाठी, पूजा-अर्चा आणि पारंपरिक कार्यक्रम यामुळे कुटुंबातील वातावरण प्रसन्न होते. आजच्या धावपळीच्या जीवनात कमी होत चाललेला प्रत्यक्ष संवाद अशा सणांमुळे पुन्हा वाढतो. एकत्र येणे, मनमोकळ्या गप्पा मारणे आणि आनंदाचे क्षण वाटून घेणे यामुळे नात्यांमध्ये आपलेपणा अधिक दृढ होतो. श्रावणातील व्रतवैकल्यांमागे केवळ धार्मिक श्रद्धा नाही, तर मानसिक शिस्त, संयम आणि सकारात्मकतेचाही संदेश आहे. जीवनात सुख-दुःखाचे अनेक प्रसंग येत असतात. अशा वेळी श्रद्धा, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचार मनाला आधार देतात. मंगळागौरसारख्या परंपरांमधून महिलांना एकत्र येण्याची, आनंद व्यक्त करण्याची आणि सामाजिक बंध अधिक दृढ करण्याची संधी मिळते. परंपरा जपत नव्या पिढीपर्यंत संस्कार पोहोचविण्याचे कामही या उत्सवांमधून घडते. श्रावणाचे वैशिष्ट्य केवळ धार्मिक परंपरांपुरते मर्यादित नाही. या महिन्यात निसर्गही नव्या रूपात बहरलेला असतो. आषाढातील पावसाने धरती हिरवाईने नटलेली असते. डोंगर-दऱ्या, शेतांची बांधं, झाडं-वेली आणि माळरानावर हिरवाईची चादर पसरलेली दिसते. श्रावणाच्या रिमझिम सरी, ढगांची दाटी आणि क्षणाक्षणाला बदलणारे ऊन-पावसाचे वातावरण मनाला प्रसन्न करून जाते. म्हणूनच बालकवींच्या 'श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे' या ओळी श्रावणाचे यथार्थ चित्र उभे करतात. क्षणात पाऊस, क्षणात ऊन आणि पुन्हा हिरवाईवर बरसणाऱ्या पावसाच्या सरी-निसर्गाच्या या लीलांनी श्रावण अधिकच मोहक बनतो. 'हासरा, नाचरा, लाजरा, सुंदर साजिरा श्रावण' असे त्याचे वर्णन करावेसे वाटते. शेतकऱ्यांसाठीही हा काळ महत्त्वाचा असतो. पावसामुळे पिकांना नवसंजीवनी मिळते आणि शिवार हिरवेगार होते.

## स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

### (नमुना झेड)

**नियम पोटनियम १०७ (११) (ड –१) स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

**जा.क्र. ०७/२६ विवअ./म.स.का.क्र. १५६ / स्थावर ताबा**
**दिनांक : १७/०८/२०२६**

वाचावे

१) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, संगमनेर यांनी पारित केलेला म.स.का.क्र. १०१ अन्वये वसुली दाखला क्र. ३७०/२०२५
दिनांक : २७/०२/२०२५
२) मा. विशेष वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम क्रमांक १०७, अन्वये दिलेल्या नोटीस अनुक्रमे -
अ) थकबाकी मागणी नोटीस १०७ (३) अन्वये दिनांक ०५/०५/२०२५
ब) जंगम जप्ती पूर्वी नोटीस १०७ (५) अन्वये दिनांक १८/०८/२०२५
क) स्थावर जप्ती हुकूम १०७ (१०) अन्वये दिनांक ०६/१०/२०२५
जं. पंचनामा -१३/०९/२०२५

त्या अर्थी कर्जदार श्री./सौ. भिमराज जयराम म्हस्के, रा. गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी कर्ज थकबाकी रक्कम जमा करणेस कसूर केल्यामुळे थकबाकी कर्जदाराला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. विशेष करून कर्जदार व जामिनदार नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेची खाली सही करणाऱ्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दिनांक १७/०९/२०२६ या दिवशी मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
ज्या अर्थी सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांच्या कर्जाचा बोझा रक्कम असे एकूण वसुली खर्चास अधीन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| वसुली दाखला क्र. | मालमत्ता मिळकत धारकाचे नाव | गावाचे नाव | गट नं./सि.स. नं. ग्रा.पं. मालमत्ता | क्षेत्रफळ | मिळकतीची चतु:सीमा |
|---|---|---|---|---|---|
| ३७०/२०२५ | भिमराज जयराम म्हस्के | गुंजाळवाडी | २१८/५६/३ | ०.०२.५० | नकाशा प्रमाणे |

सदर नोटीस आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

१) कर्जदार :- श्री./सौ. - भिमराज जयराम म्हस्के
गुंजाळवाडी, संगमनेर
२) जामिनदार :- श्री./सौ. - विलास कारभारी पावबाके
रा. पावबाकी, ता. संगमनेर
३) जामिनदार :- श्री./सौ. - भाऊसाहेब कारभारी पावबाके
रा. पावबाकी, ता. संगमनेर

विशेष टिप - मा. विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे समन्स, नोटीस घेण्यास टाळाटाळ करणे त्यास प्रतिबंध करणे, आदेश नाकारणे, वसुली कामी अडथळे निर्माण करणे इ. बेकायदेशीर कृत्य आपणाकडून घडल्यास कायद्यानुसार आपणावर दंडात्मक कारवाई होऊन कैदेच्या शिक्षेची तरतूद आहे. याची थकबाकीदारांनी व जामिनदारांनी विशेष नोंद घ्यावी.

**एन. एस. यादव**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**मो. ९८२२१०११५६**
**महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.**
**संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

# जिजामाता स्कूलच्या विद्यार्थ्यांची स्वातंत्र्यदिनानिमित्त भुईकोट किल्ल्याला भेट




युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून जिजामाता स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी ऐतिहासिक व शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले. इयत्ता सहावी ते नववीच्या घटक चाचणी परीक्षेत प्रथम पाच क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना या विशेष शैक्षणिक सहलीसाठी नेण्यात आले.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी आशिया खंडातील पहिले रणगाडा संग्रहालय तसेच ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याला भेट दिली. रणगाडा संग्रहालयातील विविध रणगाडे, त्यांचा इतिहास, युद्धातील त्यांचे महत्त्व तसेच भारतीय सैन्याच्या शौर्याची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील इतिहास प्रत्यक्ष वस्तू व स्थळांच्या माध्यमातून समजून घेण्याची अनोखी संधी मिळाली.त्यानंतर विद्यार्थ्यांनी भुईकोट किल्ल्याची पाहणी करून त्याचा ऐतिहासिक वारसा, स्थापत्यरचना, किल्ल्याचे महत्त्व आणि स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित विविध माहिती जाणून घेतली. ऐतिहासिक स्थळांना प्रत्यक्ष भेट दिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी कुतूहल निर्माण झाले तसेच देशाचा गौरवशाली वारसा जपण्याची भावना अधिक दृढ झाली.

गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल प्रोत्साहन मिळावे आणि अभ्यासाबरोबरच त्यांना ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाची ओळख व्हावी, या उद्देशाने या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा उत्स्फूर्तपणे आनंद घेतला. या शैक्षणिक भेटीस विद्यार्थ्यांसोबत प्राचार्या जिज्ञासा कुलकर्णी, व्यवस्थापक विकास उंबरकर, समन्वयक संदीप आभाळे आणि प्रियांका कर्डीले उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने किल्ला व संग्रहालयाची माहिती घेतली. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्याबरोबरच त्यांच्यामध्ये देशप्रेम, इतिहासाविषयी अभिमान आणि भारतीय शौर्यपरंपरेबद्दल आदर निर्माण झाला. जिजामाता स्कूलच्या या उपक्रमाचे विद्यार्थी व पालकांकडून कौतुक करण्यात आले.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त कॅनरा बँकेकडून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती



देवगाव (प्रतिनिधी) : स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून कॅनरा बँक, संगमनेर शाखेच्या वतीने डॉ. अण्णासाहेब शिंदे विद्यालय, देवगाव येथील इयत्ता ५ वी ते १० वीमधील मागासवर्गीय प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्या ज्योती शिष्यवृत्ती' प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ मिळाले.

या शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असून, यावेळी विद्यार्थ्यांना पासबुकचे वितरणही करण्यात आले. शिष्यवृत्तीचा लाभ मिळालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आरोही सुरेश रोहम (इयत्ता ५ वी) व श्रद्धा गौतम पवार (इयत्ता ६ वी) यांना प्रत्येकी ३ हजार रुपये, ऋतुजा नितीन ठोंबरे (इयत्ता ७ वी) यांना ३ हजार रुपये, तर दिव्या गोरख पवार (इयत्ता ८ वी), शीतल गोवर्धन माळी (इयत्ता ९ वी) आणि नयन विनोद पवार (इयत्ता १० वी) यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली.

शिष्यवृत्ती व पासबुक वितरणाचा कार्यक्रम कॅनरा बँक, संगमनेर शाखेचे सहायक व्यवस्थापक मा. हर्षल ठाकरे तसेच बँक कर्मचारी समीर फाफाळे व विजय कासार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल विद्यालयाच्या वतीने कॅनरा बँकेचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. विशेषतः या उपक्रमासाठी सहकार्य केल्याबद्दल सहायक व्यवस्थापक हर्षल ठाकरे यांचेही विशेष आभार मानण्यात आले.

दरम्यान, डॉ. अण्णासाहेब शिंदे विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळवून देण्यासाठी मा. तुषार पानसरे यांनी कॅनरा बँकेच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत विशेष प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांचे गावातील नागरिक, शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक करून त्यांचे हार्दिक अभिनंदन व आभार व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आर्थिक मदत मिळणे म्हणजे त्यांच्या स्वप्नांना बळ मिळणे होय. गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना अशा प्रकारे प्रोत्साहन देणारे उपक्रम त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरतात.

## टेंडर नोटीस

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँकेस त्यांच्या नव्याने उघडणाऱ्या संगमनेर खुर्द, ता. संगमनेर शाखेचे कन्ट्रक्शन प्लंबिंग इलेक्ट्रिक काम करायचे आहे. त्यासाठी बँकेच्या वेबसाईटवर टेंडर सबंधीत सर्व कागदपत्रे उपलब्ध केलेली आहेत. सबंधीत कंत्राटदारांनी बँकेच्या साईटवरून टेंडर डाऊनलोड करावे आणि आपल्या कागदपत्रांसह व बोलीसह बँकेच्या कार्यालयात दिनांक २५/०८/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत मा. चेअरमन सो/ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष टेंडर निविदा जमा करावी.

**वेबसाईटचा पत्ता**
**www.smbt.bank.in**

## Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project

**E-TENDER NOTICE NO : 2026_DOAWB_1328252_1**

*Survey, Design, Fabrication, Supply, Installation, Testing & Commissioning Of Total 10.00 Kwp Of "On Grid" Connected Rooftop Solar Pvpower Plant including Comprehensive Maintenance Contract (CMC) For 3 Years*

**Supply, Installation, Testing & Commissioning Of Electronic Weighing Bridge 50 MT**

The Government of Maharashtra is implement50 the World Bank-funded SMART Project. Mulamai Agro Farmers Producer Company Limited, A.P/ Wambhori fata Tal. Rahuri, Dist. Ahilyanagar is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org**, in *tender and procurement section.* The last date for submission of online bid is 25/**08/2026 up to 02:00 PM**. Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit (SMART), Ahilyanagar**

## छोटी जाहीरात

**CHANGE IN NAME**
**I HAVE CHANGED MY OLD NAME**
SOMESHWAR SURAYABHAN DIWATE
**TO NEW NAME**
SOMESHWAR SURAYABHAN DIVATE
BY AFFIDAVIT NO 994/2026
DATE 17/08/2026
ADD- A/P LANE-1, SHIVAJI NAGAR,
OPP MARKET YARD,
SANGAMNER,
DIST.AHILAYANAGAR-422605

**CHANGE IN NAME**
**I HAVE CHANGED MY OLD NAME**
DALARAM VIRARAM CHOUDHARI
**TO NEW NAME**
DALARAM CHOUDHARI
BY AFFIDAVIT NO 993/2026
DATE 17/08/2026
ADD- A/P VAIBHAV COMPLEX,
NAVIN NAGAR ROAD,
OPP NAGARE HOSPITAL,
SANGAMNER,
DIST. AHILAYANAGAR-422605

**CHANGE IN NAME**
**I HAVE CHANGED MY OLD NAME**
CHAGANLAL UKARAM SUTAR
**TO NEW NAME**
CHAGANLAL UKAJI SUTAR
BY AFFIDAVIT NO 992/2026
DATE 16/08/2026
ADD- A/P RAJALAXMI TIMARS,
HUNDAI SHOWROOM SAMOR
NAGAR ROAD, SANGAMNER,
DIST.AHILAYANAGAR-422605

**CHANGE IN NAME**
**I HAVE CHANGED MY OLD NAME**
REKHARAM JEPARAM PRAJAPATI
**TO NEW NAME**
RAKESKUMAR PRAJAPATI
BY AFFIDAVIT NO 991/2026
DATE 14/08/2026
ADD- A/P CHANDAK COMPLEX,
NEW NAGAR ROAD,SANGAMNER,
DIST.AHILAYANAGAR-422605

**CHANGE IN NAME**
**I HAVE CHANGED MY OLD NAME IS**
JSUNIL RAOSAHEB KHEMNAR
(BOARD CERTIFICATE)
**TO NEWNAME AS**
SUNIL RAVASAHEB KHEMNAR
(AADHAR NO. 58082633 7510)
FROM VIDEAFFIDAVIT BEFORE
NOTARYPUBLIC SANGAMNAR
PLACE:SANGAMNAR
DATE: 16/08/2026

**पाहिजेत**
**सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर**
ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा
स्क्रिन प्रिटींग – २ जागा
टेलीकॉलर – २ (महिला)
– संपर्क –
**९८२२४५३०३६**

**पाहिजेत**
**श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्**
**श्री गणेश टायर्स**
**श्री गणेश ऑइल सेंटर**
**या फर्मसाठी**
**अकाऊंटंट - 2 जागा**
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
**८९९९८६२७५९**

**पाहिजेत**
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २
शिक्षण - ग्रॅज्युवेट/१२ वी –
डायलिसिस टेक्निशियन -२
कॅथलॅब टेक्निशियन - १
नर्सिंग सुपरवाईझर -१
**कुटे हॉस्पिटल**
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
**8888882225**
**9766855593**

**नेवासकर ऑटोमोबाईल्स**
**पाहिजेत**
**सर्व्हीस सुपरव्हायझर**
**२ जागा**
संगमनेर
**8793223344**
**8446300400**

**फ्लॅट विकणे आहे**
**2 BHK फ्लॅट विकणे आहे**
**नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह**
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
**8788945208**
**8208223721**






## दिनविशेष

२००८: — हक्कभंगाची कारवाई होण्याची शक्यता असल्यामुळे पाकिस्तानचे अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांनी राजीनामा दिला.
२००५: — जावा बेटावर वीज गेल्यामुळे १० कोटी लोक अंधारात.
१९९९: — गुन्हा शाबित झाल्यानंतर तुरुंगवास भोगत असलेल्या वा पोलिस कोठडीतल्या व्यक्तीस मतदानाचा हक्क बजावण्यास सर्वोच्च न्यायालयाची मनाई.
१९६३: — जेम्स मेरेडिथ हा मिसिसिपी विद्यापीठातून स्नातक होणारा पहिला श्यामवर्णीय व्यक्ती झाला.
१९५८: — बांग्लादेशचे ब्रोजन दास इंग्लिश खाडी पार करणारे पहिले आशियाई ठरले.
१९४५: — इंडोनेशियाच्या पहिल्या अध्यक्ष पदावर सुकारणो हे कार्यरत झाले.
१९४२: — उत्तर प्रदेशातील गाझियाबाद जिल्ह्यातील मोहम्मदाबाद येथे तिरंगा फडकावला.
१९२०: — अमेरिकेच्या स्त्रियांना मतदानाचा अधिकार.
१८४१: — जगात सर्वप्रथम ब्रिटनमधे राष्ट्रीय अग्निशमन दलाची स्थापना झाली.

## जन्म

१९८०: प्रीती जंघियानी — अभिनेत्री
१९६७: दलेर मेहंदी — भारतीय पंजाबी गायक, गीतकार आणि रेकॉर्ड निर्माते
१९६२: फेलिप कॅल्डेरॉन — मेक्सिको देशाचे ५६वे राष्ट्राध्यक्ष, वकील आणि राजकारणी
१९५६: संदीप पाटील — भारतीय फलंदाज
१९३६: रॉबर्ट रेडफोर्ड — हॉलिवूड अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते, उद्योगपती, पर्यावरणवादी
१९३५: हिफिकेपुण्ये पोहंबा — नामिबिया देशाचे २रे अध्यक्ष, वकील आणि राजकारणी
१९३४: गुलजार (संपूर्णसिंह कालरा) — गीतकार, कवी, लेखक दिग्दर्शक — पद्म भूषण, अकादमी पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार
१९३२: ल्यूक मॉंटाग्नियर — फ्रेंच विषाणूशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार (निधन: ८ फेब्रुवारी २०२२ )
१९२३: सदाशिव शिंदे — भारतीय क्रिकेटपटू (निधन: २२ जून १९५५ )
१९०८: एडगर फौर — फ्रान्स देशाचे १३९वे पंतप्रधान, इतिहासकार आणि राजकारणी

## मृत्यू

२०१५: सुवरा मुखर्जी — भारताचे माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या पत्नी (जन्म: १७ सप्टेंबर १९४० )
२०१२: रा. की. रंगराजन — भारतीय पत्रकार आणि लेखक
२००९: किम दे-जुंग — दक्षिण कोरियाचे ८वे राष्ट्राध्यक्ष
२००८: नारायण धारप — रहस्यकथाकार (जन्म: २७ ऑगस्ट १९२५ )
१९९८: पर्सिस खंबाटा — अभिनेत्री, मॉडेल आणि लेखिका, फेमिना मिस इंडिया १९६५ (जन्म: २ ऑक्टोबर १९४८ )
१९९०: बी. एफ. स्किनर — अमेरिकन मानसशास्त्रज्ञ आणि तत्वज्ञानी, स्किनर बॉक्सचे संशोधक (जन्म: २० मार्च १९०४ )
१९८६: हारून बाबुनागारी — बांगलादेशी इस्लामिक विद्वान आणि शिक्षणतज्ज्ञ (जन्म: १९०२ )
१९७९: वसंतराव नाईक — महाराष्ट्राचे ४थे मुख्यमंत्री, रोहयो योजनेचे जनक (जन्म: १ जुलै १९१३ )
१९४५: नेताजी सुभाषचंद्र बोस — भारतीय आझाद हिंद सेनाचे संस्थापक, क्रांतिकारक (जन्म: २३ जानेवारी १८९७ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१८ ऑगस्ट**

## ब्रिटनमध्ये झाली जगातील पहिल्या राष्ट्रीय अग्निशमन दलाची स्थापना

अग्निशमन सेवा ही आधुनिक समाजव्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाची आपत्कालीन सेवा आहे. आग लागल्यास जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी प्रशिक्षित अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी पोहोचते. आज जगभरात कार्यरत असलेल्या आधुनिक अग्निशमन व्यवस्थेच्या विकासात ब्रिटनचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. जगातील पहिले राष्ट्रीय पातळीवरील अग्निशमन दल ब्रिटनमध्ये स्थापन झाले, ही अग्निशमन सेवांच्या इतिहासातील महत्त्वाची घटना मानली जाते.पूर्वी आग लागल्यास नागरिक, स्थानिक स्वयंसेवक, विमा कंपन्यांचे कर्मचारी किंवा स्थानिक पथके आग विझविण्याचे काम करत असत. विशेषतः लंडनसारख्या मोठ्या शहरांमध्ये वारंवार लागणाऱ्या आगीमुळे एकसंध आणि संघटित अग्निशमन व्यवस्थेची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. औद्योगिक क्रांतीमुळे शहरांची वाढ, लोकसंख्येची वाढ आणि इमारतींची वाढती संख्या यामुळे आगीचा धोका अधिक वाढला.लंडनमध्ये अग्निशमन सेवांचा विकास टप्प्याटप्प्याने झाला. सुरुवातीला विविध विमा कंपन्यांनी स्वतःची अग्निशमन पथके तयार केली होती. मात्र ही व्यवस्था मर्यादित स्वरूपाची होती. कोणत्या इमारतीचा विमा कोणत्या कंपनीकडे आहे, यावरही अग्निशमन पथकाची मदत अवलंबून असे. त्यामुळे सर्व नागरिकांना समान आणि तातडीची अग्निशमन सेवा मिळण्यासाठी सार्वजनिक स्वरूपाच्या यंत्रणेची आवश्यकता निर्माण झाली.या पार्श्वभूमीवर लंडन फायर इंजिन एस्टॅब्लिशमेंटसारख्या संस्थांनी अग्निशमन व्यवस्थेला अधिक संघटित स्वरूप देण्यास सुरुवात केली. पुढे ब्रिटिश सरकार आणि स्थानिक प्रशासनाने अग्निशमन सेवेला अधिक व्यापक व सार्वजनिक स्वरूप देण्याच्या दिशेने पावले उचलली.१८६६ मध्ये लंडनमधील अग्निशमन सेवा सार्वजनिक स्वरूपात आणण्यात आली आणि मेट्रोपॉलिटन फायर ब्रिगेडची स्थापना करण्यात आली. या व्यवस्थेमुळे लंडनमधील अग्निशमन सेवा अधिक केंद्रीकृत, प्रशिक्षित आणि शिस्तबद्ध झाली. घोडागाड्यांद्वारे अग्निशमन उपकरणे घटनास्थळी नेली जात आणि प्रशिक्षित जवान आग विझविण्याचे काम करत.यानंतर ब्रिटनमध्ये स्थानिक पातळीवरील अग्निशमन सेवांचे एकत्रीकरण आणि राष्ट्रीय स्तरावरील समन्वय वाढत गेला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मोठ्या प्रमाणावर बॉम्बहल्ले झाल्याने ब्रिटनच्या अग्निशमन दलासमोर अभूतपूर्व आव्हाने निर्माण झाली. या काळात अग्निशमन सेवांचे राष्ट्रीय स्तरावर समन्वयित काम किती महत्त्वाचे आहे, हे प्रकर्षाने स्पष्ट झाले.१९४१ मध्ये ब्रिटनमध्ये नॅशनल फायर सर्व्हिस (National Fire Service) स्थापन करण्यात आली.त

## संदीप पाटील : भारतीय क्रिकेटमधील आक्रमक फलंदाज

**जन्मदिन विशेष**

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात आपल्या आक्रमक फलंदाजीने वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या खेळाडूंमध्ये संदीप पाटील यांचे नाव आदराने घेतले जाते. १८ ऑगस्ट १९५६ रोजी मुंबई येथे जन्मलेले संदीप पाटील हे भारतीय क्रिकेट संघाचे माजी फलंदाज आणि प्रशिक्षक आहेत. त्यांच्या काळात भारतीय क्रिकेटमध्ये पारंपरिक फलंदाजीसोबत आक्रमक आणि निर्भीड क्रिकेटची झलक दाखविणाऱ्या खेळाडूंमध्ये त्यांचा समावेश होता.संदीप पाटील यांना लहानपणापासूनच क्रिकेटची आवड होती. त्यांचे वडील मधुसूदन पाटील हे प्रसिद्ध क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक होते. त्यामुळे क्रिकेटचे संस्कार त्यांना घरातूनच मिळाले. मुंबईच्या क्रिकेट संस्कृतीत त्यांनी आपल्या खेळाला आकार दिला. शालेय आणि क्लब क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केल्यानंतर त्यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये प्रवेश केला. रणजी करंडक स्पर्धेत मुंबईकडून



खेळताना त्यांनी आपल्या फलंदाजीची क्षमता सिद्ध केली.१९८०च्या दशकाच्या सुरुवातीला संदीप पाटील यांची भारतीय संघात निवड झाली. त्यांनी १९८० मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यांची फलंदाजी शैली आक्रमक होती. वेगवान गोलंदाजांविरुद्ध पुढे येऊन फटके मारण्याची त्यांची क्षमता विशेष उल्लेखनीय होती. १९८१ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत त्यांनी महत्त्वपूर्ण डाव खेळत आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली.१९८२ मध्ये श्रीलंकेविरुद्ध त्यांनी कसोटी क्रिकेटमधील पहिले शतक झळकावले. त्याच काळात त्यांनी एकदिवसीय क्रिकेटमध्येही आपली ओळख निर्माण केली. १९८३ मध्ये भारताने जिंकलेल्या विश्वचषक संघात संदीप पाटील यांचा समावेश होता. त्या स्पर्धेत त्यांनी ऑस्ट्रेलियाविरुद्ध प्रभावी अर्धशतक झळकावत भारतीय संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.संदीप पाटील यांच्या कारकिर्दीतील एक संस्मरणीय प्रसंग म्हणजे १९८२ मध्ये मँचेस्टर येथे इंग्लंडविरुद्ध केलेली १२९ धावांची खेळी. या डावात त्यांनी वेगवान गोलंदाज बॉब विलिस यांच्याविरुद्ध आक्रमक फलंदाजी केली. त्यांच्या निर्भीड फलंदाजीमुळे ते क्रिकेटप्रेमींमध्ये विशेष लोकप्रिय झाले.आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्यांनी भारतासाठी २९ कसोटी सामने खेळून १,५८८ धावा केल्या, तर ४५ एकदिवसीय सामन्यांत १,००५ धावा केल्या. कसोटीत त्यांच्या नावावर चार शतके आणि आठ अर्धशतके आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्यांनी नऊ अर्धशतके केली.खेळाडू म्हणून कारकीर्द संपल्यानंतर संदीप पाटील यांनी प्रशिक्षक आणि क्रिकेट प्रशासक म्हणूनही योगदान दिले. त्यांनी भारतीय संघाचे प्रशिक्षक म्हणून काम केले. तसेच राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली.आक्रमक फलंदाजी, आत्मविश्वास आणि निर्भीड वृत्ती यामुळे संदीप पाटील यांनी भारतीय क्रिकेटमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. भारतीय क्रिकेटच्या संक्रमणकाळातील हा धडाडीचा फलंदाज आजही आपल्या शैलीदार आणि आक्रमक खेळासाठी क्रिकेटप्रेमींच्या स्मरणात आहे.

## दंडे गोल्ड अँड डायमंड्समध्ये 'कर्णफुल' महोत्सव सुरु



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - १९२७ पासून ग्राहकांच्या विश्वासाची परंपरा जपत दंडे गोल्ड अँड डायमंड्सने आपल्या दागिन्यांच्या समृद्ध कलेक्शनसोबत ग्राहकांच्या बदलत्या पसंतीनुसार नवनवीन डिझाईन्स सादर करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. नाशिक रोड, सिन्नर आणि संगमनेर या तीन शाखांमधून ग्राहकांना दर्जेदार सोन्याचे, हिऱ्यांचे व चांदीचे दागिने उपलब्ध करून देणाऱ्या दंडे गोल्ड अँड डायमंड्सच्या वतीने यंदा खास 'कर्णफुल महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. दंडे गोल्ड अँड डायमंड्सच्या नाशिक रोड, सिन्नर आणि संगमनेर या तिन्ही शाखांमध्ये 'कर्णफुल महोत्सव २०२६'ची दिमाखात सुरुवात झाली आहे. या महोत्सवाचा शुभारंभ करताना पेढीचे जनरल मॅनेजर याकूब शेख, संचालक अनिल दंडे, सौ. सुप्रिया दंडे, सौ. मीना दंडे, आर्किटेक्ट जान्हवी शिंदे, पेढीचे सीएक्सओ छोटू निकुंभ, शाखा व्यवस्थापक रवी जाधव तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

या महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे ५,००० पेक्षा अधिक नवीन डिझाईन्स. सोन्याचे, हिऱ्यांचे व चांदीचे कर्णफुलांचे असंख्य डिझाईन्स, तसेच ट्रेडिशनल, ट्रेंडी आणि मॉडर्न अशा विविध शैलींचे कलेक्शन ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. मुंबई, कोईम्बतूर, जयपूर, कोल्हापूर, अहमदाबाद, राजकोट, कोलकाता, कोचीन यांसह देशातील विविध प्रांतांमधून निवडक कर्णफुलांचे डिझाईन्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कर्णफुलांच्या या खास कलेक्शनमध्ये ९, १४, १८ आणि २२ अश्या विविध कॅरेटमधील सोन्याचे कर्णफुले आहे, तसेच डायमंड आणि ९२.५ सिल्व्हर कर्णफुलांचीही असंख्य व्हरायटी खास उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यावेळी सौ. मीना दंडे आणि सौ. सुप्रिया दंडे यांनी विशेषतः महिला ग्राहकांना कर्णफुल महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. आपल्या आवडीच्या कर्णफुलांची निवड करण्यासाठी तसेच महोत्सवासाठी खास आणण्यात आलेले नवीन, आकर्षक आणि ट्रेंडी डिझाईन्स प्रत्यक्ष पाहण्यासाठी महिलांनी आवर्जून दंडेच्या शोरूमला भेट द्यावी, असे त्यांनी सांगितले. महोत्सवात ग्राहकांसाठी विशेष ऑफर्सही देण्यात आल्या आहेत. सोन्याच्या कर्णफुलांच्या मजुरीवर ३०% पर्यंत सूट, तर हिऱ्यांच्या कर्णफुलांच्या मजुरीवर सरसकट ५०% सूट देण्यात येत आहे.

१४ ऑगस्ट ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या या महोत्सवात कर्णफुलांच्या असंख्य डिझाईन्सचा अनुभव घेण्यासाठी ग्राहकांनी नाशिक रोड, सिन्नर आणि संगमनेर येथील दंडे गोल्ड अँड डायमंड्सच्या शोरूमला भेट द्यावी.

## गोवंश तस्करीविरोधात संगमनेर पोलिसांची कामगिरी

### आठ महिन्यांत ५८ गुन्हे, ९२ आरोपींवर कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गोवंशाची अवैध वाहतूक, गोमांसाची विक्री व तस्करी करणाऱ्यांविरोधात संगमनेर शहर पोलिसांनी गेल्या आठ महिन्यांत मोठी मोहीम उघडली आहे. १ जानेवारी ते १३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत स्थानिक गुन्हे शाखा, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाचे पथक आणि संगमनेर शहर पोलिस ठाण्याच्या संयुक्त कारवाईत तब्बल ५८ गुन्हे दाखल करून ९२ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत २ कोटी ८३ लाख ८२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिवंत गोवंशाशी संबंधित २४ गुन्ह्यांमध्ये १२ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून, या कारवाईत ९० लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर गोमांसाशी संबंधित ३४ गुन्ह्यांमध्ये ८० आरोपींवर कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून १ कोटी ९३ लाख ३६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गोवंशाची अवैध वाहतूक, कत्तलीसाठी होणारी तस्करी तसेच गोमांसाची बेकायदेशीर विक्री यामध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींवर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले आहे. विविध ठिकाणी केलेल्या कारवायांमुळे या अवैध व्यवसायाला मोठा धक्का बसल्याचे पोलिसांच्या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, या प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये वारंवार सहभागी होणाऱ्या आरोपींवरही पोलिसांनी कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. अशा तीन टोळ्यांविरोधात भारतीय न्यायसंहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम १११ व ११२ अन्वये संघटित गुन्हेगारीच्या अनुषंगाने कारवाई करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

गोवंश तस्करी आणि गोमांस विक्रीच्या माध्यमातून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात यापुढेही सातत्याने कारवाई केली जाणार आहे. अशा अवैध प्रकारांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींची माहिती घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी दिला आहे.

## श्रावणी सोमवारनिमित्त काशीविश्वेश्वर मंदिरात आ. तांबेंची सप्तनीक पूजा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारनिमित्त डाके फार्म येथील श्री काशीविश्वेश्वर महादेव मंदिरात भक्तिमय वातावरणात अभिषेक व पूजा करण्यात आली. यावेळी डॉ. मैथिली तांबे यांच्यासमवेत सपत्नीक भगवान महादेवांचा विधिवत अभिषेक करून मनोभावे पूजा-अर्चा व प्रार्थना करण्यात आली.

श्रावणातील पहिल्या सोमवारी भगवान शिवाच्या उपासनेला विशेष महत्त्व असल्याने मंदिर परिसरात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले होते. महादेवांच्या चरणी जलाभिषेक करून सर्वांच्या सुख, शांती, आरोग्य आणि समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी श्रावण महिना प्रत्येकाच्या जीवनात आनंद, समाधान आणि सकारात्मकता घेऊन यावा, अशी मनोकामना व्यक्त करण्यात आली. निसर्गात श्रावणाच्या आगमनाने नव्या पालवीचा बहर येतो, त्याचप्रमाणे प्रत्येकाच्या मनात नव्या आशा, नव्या ऊर्जेची आणि सकारात्मक विचारांची पालवी फुटावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## काशेश्वर विद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

### इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा वैशाली चोपडे प्रमुख पाहुण्या; विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

युवावार्ता (प्रतिनिधी)

कासारा दुमाला येथील काशेश्वर विद्यालयात देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरच्या अध्यक्षा वैशाली चोपडे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांसोबत स्वातंत्र्यदिन साजरा करताना लहानपणीच्या स्वातंत्र्यदिनाच्या सुंदर आठवणींना उजाळा मिळाला. विद्यार्थ्यांचा उत्साह, ऊर्जा आणि देशभक्तीपूर्ण वातावरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरच्या माध्यमातून विद्यालयासाठी राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा तसेच मालपाणी परिवाराकडून विद्यालयाला मिळालेल्या सहकार्याचा शिक्षकवृंदाने आवर्जून उल्लेख केला. क्लबच्या कार्याची विद्यालयाने केलेली प्रशंसा ही पुढील सामाजिक कार्यासाठी प्रेरणादायी असल्याचे अध्यक्षा वैशाली चोपडे यांनी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरच्या अध्यक्षा वैशाली चोपडे, उपाध्यक्षा दिपमाला भोट, सचिव अश्विनी धोळे, एडिटर खोसे मॅडम व क्लब ॲडमिन पूजा आनंद हासे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास कासारा दुमाला गावचे सरपंच राजेंद्र त्रिभुवन, उपसरपंच अमोल वाळके, मानव विकास मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब वाळके, सचिव संजय सातपुते, संचालक बी. के. गायकवाड सर, बाबूलाल बुळकुंडे,



संतोष शिंदे, कैलास फटांगरे, प्रल्हाद देवकर, माजी सरपंच नारायणराव शिंदे, काशेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक भाऊसाहेब शिंदे, अर्जुन वाळके सर, नानासाहेब भास्कर ,संदेश चोपडे ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काशेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद व विद्यालय परिवाराने केलेल्या प्रेमळ निमंत्रणाबद्दल आणि सहकार्याबद्दल इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# शिवराज्याभिषेकाच्या थरारक सादरीकरणाने 'जोश - द डान्स शो'ला संगमनेरकर मंत्रमुग्ध

## लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरचा स्वातंत्र्योत्सव उत्साहात





### सामाजिक आणि सांस्कृतिक योगदानात लायन्सचे काम मोठे - आ. अमोल खताळ

**लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन नेहमीच संगमनेरकरांच्या मनाचा ठाव घेत अनेक सामाजिक तसेच सांस्कृतिक उपक्रम राबवित असतो. गिरीश मालपाणी आणि श्रीनिवास भंडारी यांच्या नेतृत्वातून सुरू असलेला हा क्लब जगातील सर्वात मोठा क्लब असल्याचेही मला समजले त्याचा विशेष आनंद आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरच्या वतीने गेल्या २३ वर्षांपासून सुरू असलेल्या स्वातंत्र्योत्सव उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेला 'जोश : द डान्स शो' हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध शाळा व नृत्यसंस्थांच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक नृत्याविष्कारांनी उपस्थित संगमनेरकरांची मने जिंकली. विशेषतः शिवराज्याभिषेकाचे रायगडच्या जय हनुमान कला मंचने केलेले सादरीकरण कार्यक्रमाचे सर्वोच्च आकर्षण ठरले. या सादरीकरणातून जणू छत्रपती शिवाजी महाराज प्रत्यक्ष समोर उभे असल्याची अनुभूती उपस्थितांना आली आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

मालपाणी लॉन्स, लक्ष्मी रोड येथे झालेल्या या कार्यक्रमास आमदार अमोलजी खताळ, नीलमताई खताळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. माजी प्रांतपाल राजेशजी कोठावदे, रिजन चेअरपर्सन संदीपजी गोंदकर, झोन चेअरपर्सन चेतनजी भुतडा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. भाऊसाहेब लवांडे, महेश वैद्य, अनिल डोरवानी, विजय थोरात आदी मान्यवरही यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात माल्यार्पण व मशाल प्रज्वलनाने झाली. अध्यक्ष जितेश लोढा यांनी लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरच्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. वंदे मातरम्, 'ऐ मेरे वतन के लोगों' आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाला देशभक्तीपूर्ण वातावरण लाभले.

यावेळी बोलताना माजी प्रांतपाल राजेशजी कोठावदे, रिजन चेअरपर्सन संदीपजी गोंदकर आणि झोन चेअरपर्सन चेतनजी भुतडा यांनी लायन्स क्लबचे संस्थापक अध्यक्ष गिरीशजी मालपाणी, माजी अध्यक्ष श्रीनिवासजी भंडारी यांच्या नेतृत्वगुणांचे विशेष कौतुक केले. सामाजिक बांधिलकीसोबतच सांस्कृतिक क्षेत्रातही सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची क्लबची परंपरा उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार अमोलजी खताळ व नीलमताई खताळ यांनी लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरचे कौतुक करताना सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात संगमनेरमध्ये लायन्स क्लब नेहमीच अग्रेसर राहिला असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांच्या माध्यमातून नव्या पिढीमध्ये देशप्रेम जागविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांसाठी हे मोठे व्यासपीठ असल्याचे त्यांनी सांगितले.

सुमारे २५० कलाकारांनी आपल्या नृत्याविष्कारातून भारताच्या संस्कृतीचा आणि शौर्याचा जागर यावेळी केला. जय हनुमान कला मंच, रायगड यांच्या पोतराज, बाजी प्रभू देशपांडे, कृष्णा फ्युजन आणि विशेषतः शिवराज्याभिषेकाच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

याशिवाय मुद्रा डान्स अकॅडमी, ध्रुव ग्लोबल स्कूल संगमनेर, जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल, पोदार इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूल, अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल, स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल, कृष्णा गोविंद डान्स अकॅडमी तसेच एक्स स्ट्रेंजर ग्रुप, लोणी यांनी विविध विषयांवरील नृत्य सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. प्रत्येक सादरीकरणामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कोरिओग्राफर्सचे योगदान दिसून आले. संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व कोरिओग्राफर्सही यावेळी उपस्थित होते. संगमनेरमधील सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या २५ रिल स्टार्सचा प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन विशेष गौरव करण्यात आला. तसेच कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक डान्स ग्रुप आणि शाळेला विशेष ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रकल्पाचे मार्गदर्शक गिरीश मालपाणी व श्रीनिवास भंडारी होते तर प्रकल्प प्रमुख म्हणून सुदीप हासे, डॉ. जितेंद्र पाटील व प्रशांत गुंजाळ यांनी काम बघितले. समन्वयक म्हणून कुलदीप कागडे यांनी काम पाहिले तर समितीमध्ये सुनिता मालपाणी, अतुल अभंग, धनंजय धुमाळ, कल्याण कासट, व्यंकटेश अमृतवाड, नितीन नवले, हर्षल सोनवणे, सचिन गाडे, विनायक भोईर, अमोल भरीतकर, संतोष अभंग, कल्पेश मर्दा, किशोर कातोरे, अक्षय गोरले, स्वाती लोढा, अंजली पाटील, सुचित्रा कातोरे, अनन्या धुमाळ, मिनल अभंग, संगिता पुंड, सोनल गोरले, निलम जोर्वेकर यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुदीप हासे व डॉ. जितेंद्र पाटील यांनी केले, तर प्रशांत गुंजाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष गिरीश मालपाणी, माजी अध्यक्ष श्रीनिवास भंडारी, अध्यक्ष जितेश लोढा, सेक्रेटरी नम्रता अभंग, खजिनदार चंद्रशेखर गाडे तसेच प्रकल्प प्रमुख व संपूर्ण लायन्स टीमने विशेष परिश्रम घेतले.

## चोरीची मोटारसायकल विक्रीच्या तयारीत असलेल्या संशयिताला पोलीसांकडून अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - चोरीची मोटारसायकल विक्री करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या एका संशयिताला नागरिकांच्या सतर्कतेमुळे संगमनेर शहर पोलिसांच्या तपास पथकाने तात्काळ ताब्यात घेतले. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिसांकडून सुरू असलेल्या पायी गस्तीवेळी संशयास्पद हालचाली करणाऱ्या व्यक्तीवर पोलिसांचे लक्ष गेले. त्याची चौकशी व तपासणी केली असता त्याच्याकडून चोरीची मोटारसायकल आणि मोबाइलसह रोख रक्कम असा एकूण १ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहरात पोलिसांकडून पायी गस्त सुरू होती. यावेळी एक व्यक्ती संशयास्पदरीत्या फिरताना दिसून आला. पोलिसांनी त्याच्यावर लक्ष ठेवून त्याची चौकशी केली. तपासादरम्यान संबंधित व्यक्ती चोरीची मोटारसायकल विक्री करण्याच्या तयारीत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या कारवाईत पोलिसांनी ९० हजार रुपये किमतीची चोरीची मोटारसायकल, २२ हजार रुपये किमतीचा मोबाइल आणि २ हजार रुपये रोख, असा एकूण १ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. संशयिताला तात्काळ अटक करण्यात आली.

वाहनचोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी संगमनेर शहर पोलिसांकडून गस्त, तपासणी आणि संशयित व्यक्तींवर नजर ठेवण्याची मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. चोरीच्या वाहनांच्या खरेदी-विक्रीबाबत नागरिकांकडे कोणतीही माहिती असल्यास ती पोलिसांना देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. ही कारवाई संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25